

# श्री साईलीला

## श्री साईनाथ प्रसन्न

वर्ष १९ ] जुलई, ऑगस्ट, सप्टेंबर १९४२ [ अंक ७-८-९

एक वयोवृद्ध संतप्रेमी गृहस्थ कळवितात की, आपले हयातींत पुष्कळ
ंतांच्या दर्शनाचा लाभ आपणांस झाला व त्यामुळें आपली संतांचें ठिकाणीं
दळ श्रद्धा बसली. अलीकडे श्री. साईनाथ महाराजांचें भक्तांचें सहवासाचा
ग घेऊन महाराजांचें विषयींचें त्यांचें गोड अनुभव वेळोवेळीं कानीं पडून अशा थोर
तांचें दर्शनाचा लाभ आपणांस घडला-नाहीं असें वाटून मन उद्विग्न झाले व एक
त्र याच मनाचे तळमळींत जागृतावस्थेंत जाऊन अखेर पुढील विचार प्रगट
ण्याची मनास ओढ लागून ते तसे प्रगट केलेवर मनास स्वास्थ लाभलें: —

चरण कमलिं तुझ्या ठेवितों तात माथा ॥
पुनरपितरी तोचि ठेवि मी आज नाथा ॥
भजन मनन योगें चित्त माझें विराले ॥
तवपद कमलीं वा आत्मरूपास लागे ॥ १ ॥
भो साइनाथ मम तात नमामि तुभ्यम् ॥
नत्वा पुनश्च पुनरप्यभिवाद यामि ॥
भावातिरेक परिपूनित मान सो ऽ हम् ॥
त्वत्पाद पंकज रजः कण लाभ कामः ॥ २ ॥
लीलामृतंच तव तात चिरंप्रणीय ॥
जातोत्कंठा मनसि दर्शन लालसा मे ॥
कालान्तरादपि न सा सफलान भूव ॥
तस्माद्विषण्ण मनसा भुवि संचरामि ॥ ३ ॥
शिष्योत्तमैः सह ममाद्य समागमोऽभवत् ॥
तेनैव प्राप्त नवजीवन भावनामे ॥

आर्ताय भक्तियुक्त मानस भाविकाय ॥
भो नाथ, तात, ममराम, भवास्म सान्मे ॥ ४ ॥
॥ चिदानंद प्रभो श्रीराम ॥

---

A bended bow to Baba I make
Time and again the same please let
With love for you my heart burns
A ray of light to gain for sure
Drinking deep the nector sweet
Of your words, I longed for a sight
Time flew on yet it never came
With sunken heart on earth I roam.
Your pupils great by chance I met
A ray of light seems within sight
All love sincerely devout I say
Have grace and grant full union.

The Lord is at the heart of all
Rahim or Ram Him you call
Jejus, Rahim or Ram we call
To know to realise this truth
Is the goal of life for sooth
To know to realise Him there
Is the goal of life for sure
To know, find, and attain to Him
Is what we have in life to gain
Is the goal in life to attain

—Om, Shri Ram

# श्री साई सच्चरित

## अध्यात्मिक निरीक्षण

# अध्याय ७ वा

(ले० सुमन–सुन्दर)

करावें सर्व सृष्टीचें निरीक्षण। घ्यावें तियेपासूनि शिक्षण॥
व्हावें स्वस्वरूपीं निमग्न। या विचारानें॥

—श्रीमाधनाथ दीप प्रकाश २३-१४१

गताध्यायीं श्रीसाई भगवान आपल्या हृदयासाठीं विराजला व भागवत धर्मानें 'नवनीत' जी 'एकादशी' ती आपणांकडून त्यानें करविली! म्हणजे तत्त्वत: आपण पुरुषोत्तम झालों! पण? स्वामींचें राज्य जसें व्यवहारांतली भाकरी मिळवून देत नाहीं, तसेंच नुसतें शाब्दिक पुरुषोत्तम होऊन आपल्याला स्वरूप ज्ञानाची चौतकर सुद्धां भाकरी मिळत नाहीं! ती मिळवावयास, आपणास अंतर्बाह्य पुरुषोत्तम व्हावें लागतें. त्याकरितां '**श्रवण, मनन व निदिध्यास**' ही त्रयी शास्त्रकार प्रतिपादितात व ही त्रयी आपण व्यापक अर्थानें अनुसरली पाहिजे. 'अनुसरतांना जडते नाते। जीवा शिव भेटवीतें॥' 'श्रवण' म्हणजे नुसतें कानानें ऐकणें नव्हे तर 'सर्व सृष्टीचें निरीक्षण' असा त्याचा व्यापक अर्थ निघतो. तसेंच 'मनन' म्हणजे जें निरीक्षिलें त्यापासून शिक्षण-सारासार-घेणें व 'निदिध्यास' म्हणजे स्वत:ला सृष्टीतील परमात्म-तत्वाशीं तद्रूप–निमग्न करून घेणें.'' 'श्रवण, मनन, निदिध्यास' यांचा एवढा व्यापक अर्थ आहे व तो जेव्हां काया-वाचा-मनें आपल्याकडून पूर्णत्वानें अनुसरला जाईल तेव्हांच आपण पुरुषोत्तम होऊं!

आतां पार्वतींच्या 'निरीक्षणांति आपण श्रवण व मनन यांचेंच प्राय: मंथन केलें; रहातां राहिला निदिध्यास! आपण भागवत आहोंत व 'सद्गुरूवीणा ब्रह्मज्ञान सर्वथा नव्हे नव्हे जाणा॥' (नाथभागवत १०–१०७) हा भागवत धर्मांचा दंडक आहे. मग आपण निदिध्यास कोणाचा करावयाचा? तर सद्गुरूचा! येथें आपले

सद्गुरु बाबाच झाले आहेत ? तेव्हां आपणां साधकांच्या निदिध्यासास उचित अशीच त्यांची विलक्षणा आपण केली पाहिजे ! बाबा स्वयमेव पुरुषोत्तम तर आहेतच; पण आपल्यापैकी प्रत्येकाला पुरुषोत्तम बनविण्यासाठींच त्यांनी अवतार धारण केला. तेव्हां पुरुषोत्तम स्वरूपांतच आपण बाबांचा निदिध्यास केला पाहिजे. पण तसें करतांना आपणास स्वतःला पुरुषोत्तम बनावयाचें आहे याची जाणीव आपण सदैव ठेवली पाहिजे. ती जेव्हां राहील तर not failure but low aim is crime हें आपणांस कळेल तेव्हांच; म्हणजेच जेव्हां पुरुषोत्तम होण्याची महत्त्वाकांक्षा आपण बाळगूं तेव्हांच ! जर आपण स्वतःला कमी लेखूं तर आपली उन्नती कधींही व्हावयाची नाहीं. ! कारण, " जसें ध्यान तसें मन । हा सिध्दांत आहे जाण ॥ " ( श्री. मा. दी. प्र. १४-५५ ) म्हणून आपण पुरुषोत्तम ध्यान नेहमीं घेतलें तरच आपलें मन पुरुषोत्तम होईल; म्हणजे आपणही पुरुषोत्तमच होऊं ! " बाबा-सद्गुरु-पुरुषोत्तम आहेत, मीही पुरुषोत्तम अतएव बाबा होईन ! ' हाच आदर्श आपण आपल्या मनापुढें सतत ठेवला पाहिजे !

पण हा आदर्श मनावर बिंबण्यास बाबांच्या बाबतींत एक मोठी अडचण येते. बाबांना आपण ' अयोजित ' व ' अलौकिक ' समजतों व आपण तर योनिज व लौकिक आहोंत. मूळांतच जर हा भेद अभेद्य आहे; तर सहजांत ' बाबा आलौकिक होते म्हणून पुरुषोत्तम झाले. आपण लौकिक पामर पुरुषोत्तम कसे होणार ? असा विकल्प येऊन आपण हताश होतो. तेव्हां आपल्या पुरुषोत्तम ध्येयासाठीं तरी, ते तसे असले तरी बाबांना सद्गुरुला अयोजित व अलौकिक भावणें चुकीचें ठरतें. आपण आपलें ध्येय असेंच ठेवलें पाहिजे कीं, बाबाही आपल्या सारखेच हाडामासाचे जन्मले ! जन्मानें ते आपल्याहून भिन्न नव्हते ! पुढें ते कृतीनें नराचे नारायण झाले तेव्हां आपणही कृतीनें नारायण होऊं. व जसा जन्मतः त्यांच्या आपल्यांत भेद नव्हता तसे अंतीही तें व आपण अभेद होऊंच होऊं ! कारण तेव्हां बाबा व आपण सर्वच नारायण होऊं

हे मी सुसंगत बरळलो खरा ! पण ? साईभक्तांत बाबा अयोनिज होते !. ही भावना इतकी दृढावली आहे कीं, वरील ध्येयासाठीं त्यांना न दुखवतां ती खोडून काढणें अतिदुर्घट काम आहे. त्याला तसाच सबळ पुरावा पाहिजे, व तोच मी येथें यथामति सादर करीत आहे.

**श्रीमाधवनाथः**—अवघ्या तीन वर्षांच्या पार्थिव सहवासांत भक्तिच्या व्यव-हारांतील आपलें **मावशीचें** नातें संभाळून, माझ्या भावना व भक्ति यत्किंचित न दुखवतां जर कोणा विभूतिनें माझें मातृवत् परिपालन केलें असेल, तर ती श्रीमाधव-नाथ हीच होय ! तिचें ऋण एका सुमनयुक्त ' नमना ' खेरीज जन्मोजन्मीं सुद्धां माझ्या हातून फिटणें शक्य नाही ! पूर्वीची ना ओळख ना देख ! मी पुण्यांत सतत चार वर्षे असून कधी दर्शन-सुहावा सुद्धां साधला नव्हता. बरें जी काय कर्णोपकर्णी माहिती मिळाली तीही बाजारबुणगी अतएव विकल्पकारकच ! पण त्याच माउलीनें मला माझ्या विवाहाच्या निमित्तानें अकल्पित आपल्या पायाशीं खेचित आणलें व प्रथमताच ' तुम्हांला ज्योतिष कळतें का ? ' या एकाच प्रश्नांत माझें ज्योतिष जाणवून तिनें मला आपलेसें करून घेतलेन ? व्यवहारांत व माझ्या भक्तींत तिनें मला केव्हांही दुखविलें नाहीं; पण तसेंच मला लाडावलेंही नाहीं. ज्या गोष्टींत माझ्या निकटाच्या आप्तवर्गाची मजवर नजर रहातीना व कदाचित मी वहकलोंही असतों. त्या गोष्टींत तिनें मला वेळींच अचूक जागृति देऊन अवधान दिलेन व मला उज्वलपथ दाखविलान ! आणि तोहि कसा ? तर मला मुळींच न दुखवितां ! हेंच तर तिचें वैशिष्ट्य होय ! जसा शस्त्रक्रिया विशारद जागा मेहरून अलग कांटा काढतो तसेंच तिनें माझ्यांतील अनेक दोषरूपी कांटे काढलेन. माझा व्यवसाय व कामाची वेळ यांची तिला पूर्ण माहिती होती; व उगीच वेळ मोडून ती मला कधींही जवळ जास्त बसवून घेत नसे. पण माझ्या निरीक्षण शक्तिची पारख माझ्यापेक्षां तिला अधिक होती; व असा कांहीं माझ्या निरीक्षण शक्तिला चालना देणेचा प्रसंग येई तेव्हां ती मला हाटकून जवळ बसवून घेई; व मग मी दर्शन घेऊन निघतांना ' बाळ , असेंच अवधान राखीतजा; मी काय बोलतो तिकडे लक्ष असूं दे ! असें म्हणुन प्रेमानें माझ्या पाठीवर थाप मारी व प्रसाद देऊन निरोप देई. व अशा प्रसंगीं जें जें कांहीं तेथें घडे त्यांतच माझे दोषरूपी कांटे अलग काढले जात, माझ्या कर्तव्याची व भवितव्यतेची जाणीव मला मिळे आणि माझ्या जिज्ञासु वृत्तिला नवचैतन्य लाभे ! असो. ओघा-ओघानें प्रस्तुत अध्यायांत यथासंदर्भ तिची स्मृति झाली व आठव गादिवर येऊन अतिव्याप्तीचा दोष घेऊन सुद्धां मी हें लिहून गेलों ! सहृदय वाचक मला क्षमा करतीलच !

## श्रीमाधवनाथांचा व श्री बाबांचा संबंध काय ?

' सच्चरितां 'त कांहीं कोठें श्रीमाधवनाथांचा नामनिर्देश नाही. सर्व साई-

भक्तांसही उभयतांच्या स्नेह संबंधाची माहिती असेलच असें नाहीं; श्रीच्यासहवासांत जें बोधामृतपान मला वरचेवर मिळालें तें ठायीं ठायीं प्रस्तुत ' निरीक्षणांत ' बोलकें आहे. तसेंच ' श्रीमाधवनाथ दीपप्रकाश ' हा ग्रंथ मला ' सच्चरित-बोध देतांना किती साहाय्यक झाला हें त्यांतील घेतलेल्या पद्योपद्यांच्या संदर्भांवरून कळून येईल त्याच ग्रंथांत उभयतांच्या प्रेमसंबंधाचा पुरावा आहे.

' श्रीपरमहंस शांतनाथ । श्रीसद्गुरु साईनाथ । धुंडिराज पळुसी, गजानन शेगांवांत । गोपाळदास ( नरसिंग महाराज ) नाशिकीं ॥

हे पंचायतन नाथांचे ( श्रीमाधवनाथ ) परम होते जिव्हाळ्याचें । चाले सूत्र एकमेकांचे । अंतःशक्तिनें ॥ ( श्री. मा. दी. प्र. २२-१०९-१० )

ह्यांत बाबांना ' श्रीसद्गुरु ' असें संबोधून व स्वतःच्या परम जिव्हाळ्याच्या पंचायतनांत स्थान देऊन श्रींनी बाबांविषयीं केवढा आदर व्यक्त केला आहे हें चांगलेंच विषद होतें प्रत्यक्ष बोलण्यांत सुद्धां बाबांना ' त्रिलोकनाथ ' ' कोहिनूर असेंच श्री संबोधित हें कित्येक साईभक्तांनी ऐकलें आहे. माझ्या वैयक्तिक श्रीसद्गुरु आधीष्टीत संतमंडळांत श्रीबाबांना जें स्थान मिळालें व ज्यामुळेंच हें निरीक्षण संभवलें, त्यांची प्रतिष्ठा श्रीमाधवनाथांनी जो माझा विवाह-संबंध घडवून आणला त्यांतून प्रायः झाली; असें म्हटलें तर ती मुळीच अतिशयोक्ति नाहीं. तत्पूर्वी मला बाबांविषयीं आदर असला तरी आस्था नव्हती. असो.

श्रीबाबांचा जन्मवृत्तांत श्रीमाधवनाथांच्याच मुखांतून माझ्या कर्णरंध्रांत शिरला व म्हणूनच एवढें सविस्तर विवेचन मला करणें आलें. ती हकिकत अशी:-

वर लिहील्याप्रमाणें एकदां श्रींनीं मला असेंच बसवून घेतलें असतां, श्रीयुत रघुबंध नामक एक सद्भक्त तेथें आले. त्यांच्या मनांतून श्री साईबाबांचे चरित्र वृत्त लिहावयाचें होतें व त्याकरितां श्रीं पासुन कांहीं माहिती मिळविण्याच्या उद्देशानें ते त्यावेळीं आले होते. जें पुस्तक ते लिहिणार होते त्यांत श्री माधवनाथांनी सदरहू माहिती पुरविल्याचा उल्लेख ते करणार होते. त्यांनीं तें पुस्तक छापून प्रसिद्ध केल्याचें माझ्या ऐकिवांत नाहीं. मी त्याची एक प्रत घेणार होतों व तसें त्यावेळीं त्यांना सांगितलेंही होतें. पण आतांपावेतों तें पुस्तक मला मिळालेलें नाहीं. मिळतें तर त्यांतूनच अक्षरशः ती माहिती मी उतरली असती. पण त्याच्या अभावीं माझ्या ' स्मृति टिपणां 'तूनच ती मला घ्यावी लागत आहे. व केवळ प्रस्तुत कथानका

पुरतीच भी ती येथें येत आहे. या माझ्या खुलाशानें श्रीयुत सुबंध यांचे समाधान होईल व अतिक्रमणाचा दोष ते मला देणार नाहींत अशी आशा आहे. माझा शुद्ध हेतू पाहून त्यांनी मला क्षमा करावी.

**श्री बाबांच्या जन्मवृत्तांता** संबंधी श्री म्हणाले:—

" मोंगलाईत पाथरी म्हणून एक गांव आहे. तेथें एका यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मणास तीन मुलगे होते. वडील मुलगा हाच श्री साईबाबा! बाबा पांच वर्षांचे असतां एक ' वली ' त्या ब्राह्मणाकडे आला व ' माझे मला दे ' म्हणून म्हणाला. त्यावर ' आहे तें तुमचेच आहे ' असें बाबांच्या वडिलांनी सांगितलें. तेव्हां ' तुझा वडील मुलगा मला दे ' असें म्हणून तो वली बाबांना घेऊन गेला बाबांच्या नवव्या वर्षी परत त्यांना त्यांच्या वडिलांकडे घेऊन तो आला व त्याचे हस्ते दूध घेऊन परत बाबांना तीन वर्षें तो कोठें घेऊन गेला. वयाच्या १२ ते १८ पर्यंत बाबा अज्ञात वासांत होते. व ' १९ ' व्या वर्षी शिरडींत निंबाच्या झाडाखालीं प्रकट झाले. त्यांची मुंज झालेली नव्हती " व सच्चरितांत श्री बाबांच्या उक्तींतच ही माहिती सुसंगत असल्याचे प्रत्ययास येते.

या वरून जन्मतः बाबा हिंदु ब्राह्मण असल्याचा तर पुरावा मिळतोच; व त्यांच्या वागण्यांतील विसंगततेचेंही स्पष्टीकरण होतेः हिंदु असल्यामुळें त्यांचे कान टोंचलेले होते. मुंज उपनयन झाली नसल्यामुळें त्यांच्या गळ्यांत यज्ञोपवित नव्हते. एका वलीनें त्यांना नेलें व मोंगलाईत त्यांचा जन्म झाला यावरून यावनी वेष, भाषा आचार इत्यादिंचा बोध होतो. फक्त एका गोष्टीचा उलगडा होत नाहीं.

## ॥ हिंदु म्हणतां सुंता प्रमाण ॥ ७-१३.

अशी ' विंधित कान ' ही हिंदुत्वाची दीक्षा आहे, तशी ' सुंता ' ही यावनी दीक्षा गणली जाते खरी पण प्रत्यक्ष पुराव्याखेरीज ती पूर्णत्वानें विश्वसनीय नाही कारण जन्मतःच कित्येकांची ' चामडी ' तोकडी असते व सुंता केल्यासारखी दिसते किंवा ' चामडीचे द्वार ' बारीक किंवा बंद असते; अशावेळीं ' चामडी ' शस्त्रक्रियेनें कापून काढावी लागते. म्हणजे ' नैसर्गिक, ' ' वैद्यकीय ' व ' धार्मिक ' अशी तीन प्रकारची ' सुंता ' असूं शकते: तेव्हां बाबांच्या बाबतींत त्यांतील वस्तुस्थिति काय होती हे पुराव्यानिशीं कळल्याखेरीज केवळ ' सुंता होती म्हणून ते यवन होते ' असें म्हणणें शास्त्रविहीत ठरणार नाहीं.

बाबा ' योनिज ' होते एवढा हा पुरावा मिळाला. पण ज्यांची भावना ते ' अयोनिज ' होते अशी आहे त्यांचे समाधान कसें करावयाचें ? तर:--

' योगीनां या गति : यथापि हायकथ्या भवतो जिना ' ॥

अवधूतगीता २, २७

जे जन्मतःच ज्ञानी असतात त्यांना योनिमात्राचा दोष नसतो ! कारण दोष कोणाला ? तर ज्याला देहभान असेल त्याला ! ज्याला सदैव स्वरूप-भानच आहे त्याला देह-भान कोठचें व मग त्याला योनिज आदि मायिक दोष तरी कसले ? म्हणून जरी बाबा योनिज असले तरी आपल्या दृष्टीनें ते नाममात्र योनिज होते. तत्त्वतः त्यांचे ते अयोनिजच होत.

' तरी जो सर्वथा हरीसी समान । त्या काय म्हणावें हिंदु वा यवन ॥
असो शूद्र, अतिशूद्र, यातीविहीन । जाती न प्रमाण अणुमात्र ॥ ७-१९

( मूळांत पहिला चरण ' जो सर्वदा हरीसी शरण ' असा आहे. पण मला तो बाबांच्या वैशिष्ट्याला उचित दिसत नाहीं. मी त्यांना स्वयमेव परमात्मा भाविला आहे. म्हणून वरीलप्रमाणें मी पाठभेद केला आहे. )

' ऋषींचें कूळ आणि नदीचें मूळ पाहूं नये ' असें जें म्हणतात तें याच कारणास्तव सर्व साधारण कुत्सित अर्थानें घेतात तसं नव्हे. असो.

हें ऐतिहासिक विवेचन झालें व ते वरपांगी समाधान करूं शकेल. पण माझें मात्र तेवढ्यानेंच समाधान होत नाहीं. प्रकट झाल्यापासून तों तहत देह ठेवीपर्यंत ज्या नाटक्यानें आपली प्रत्येक कृती अर्थपूर्ण केली तो काय आपल्या जन्मरहस्याचे असे अर्थशून्य बाभाडे काढून देईल ? शक्य नाहीं ! त्यांतही त्याचा हेतू असलाच पाहिजे. तो कोणता ?

मागें चवथ्या अध्यायांत बाबांनी आपले जन्मरहस्य गुप्त ठेविलें त्याचें अध्यात्मिक विवरण आपण सुसंबद्ध केलेंच आहे. आतां बाबांनीच श्रीमाधवनाथांच्या मुखानें रहस्यस्फोट केला आहे; तेव्हां त्यांतच आपल्याला बाबांच्या जन्मरहस्याच्या गूढाचा बोध मिळेल.

श्रीभगवनाथांनी पुरविलेल्या माहितींत आपल्याला मुद्दे प्रामुख्यानें दिसतात ते असे:--

१ पांचव्या वर्षी बळीनें नेले.
२ नवव्या वर्षी परत आले.
३ एकोणिसाव्या वर्षी प्रगटले.
४ ते जन्माने ब्राम्हण होते.
५ त्यांची मुंज झाली नव्हती.

१ **पांचव्या वर्षी**:--जागृति, स्वप्न, सुषुप्ति व तुरीया अशा सामान्यतः चार अवस्था गणल्या जातात पैकीं पहिल्या तीन या त्रिगुणी-अज्ञान्यांच्या आहेत व चौथी तुरीया ही त्रिगुणातीतदेही ज्ञान्याची आहे. बळीकडून पांचव्या वर्षी नेवून बाबांनी असें दाखविलें आहे कीं, मी परमात्मा या चार अवस्थांत तर आहेच पण त्याच्या पलीकडेही ( पांचव्या वर्षी ) मी आहे, म्हणजे मी तुरीया-तीत आहें; ' तुरीयातीत ' ( परात्पर ) यावेगळें त्या अवस्थेला नांव नाहीं; ती अनिर्वाच्य आहे. गीतेंत भगवंतांनीं अर्जुनाला आपल्या सर्व विभूति सांगून शेवटीं जें सांगितलें कीं,

" अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन ।
विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ॥भ. गी. १०-४२

मी आपल्या एकाच अंशानें सर्व जग व्यापून राहिलों आहें. " तेंच बाबांनीं येथें पर्यायानें दाखविलें आहे. व स्वत: श्रीकृष्ण परमात्माच असल्याचा पुरावा दिला आहे. तेथें श्रीकृष्णानीं प्रत्येक वस्तुंतील आपल्या तेजांशाचा निर्देश केला आहे. तर येथें बाबांनीं जगतातील सर्व अवस्थांच्या आपल्या साक्षीत्वाचें प्रत्यंतर दिलें आहे.

२ **नवव्या वर्षी**:-जरी मी परमात्मा असा-तुरीयातीत, परात्पर, अगोचर अगम्य इ. असलों तरी भक्तांना मी गोचर होतों. केव्हां ? नवव्या वर्षी-नववी भक्ति जी आत्मनिवेदन, तिच्यांत । ' हरि तुका म्हणे अवघा एकला । परि हा धाकुला भक्तिसाठीं ॥ '
( गा. ३८-७ )

३ **एकोणिसाव्या वर्षी**.—सोळाव्या वर्षी प्रथम प्रगटून सोळतत्त्वांची लिंग-देहावस्था व्यतीत केली असा निर्णय आपण चवथ्या अध्यायांत काढला. तेथें पंच ज्ञानेंद्रियें, पंचकर्मेंद्रियें, पंच तन्मात्रा व एकचित्त अशीं सोळा तत्त्वें आपण घेतलीं;

त्यांतील चित्ताचे 'चित्त, मन, बुद्धि, अहंकार' असे चार विभाग केले तर बेरीज एकोणीसच येते.

एथें वाचक अशी आशंका घेतील की असे विभाग पाडल्यानें तत्त्वांत कांहीं फरक होत नाही कां ? तर नाहीं !

' आकळोनि चराचर । वस्तु असे अखंडाकार ॥

होतां जातां आकार विकार । वस्तु अणुमात्र विकारेना ॥(नाथ भागवत १९-१९५)

मूळ तत्त्व एकच आहे. केवळ मायिक उपाधींनें त्यावर निरनिराळे आरोप तत्त्वविवेचनासाठीं केले जातात. नामरूपादि ( आकारविकार ) सर्व उपाधि मायेच्या आहेत. आत्म्याच्या ( वस्तूच्या ) नाहींत. तत्वतः ' माया ' म्हणजेच जर मिथ्या, तर तिच्या उपाधिही मिथ्याच. वस्तु ज्ञात होईपर्यंत ती प्राप्त होण्यासाठीं या लटक्याच उपाधि आपणास खऱ्या मानाव्या लागतात. वस्तु प्राप्त झाली-आत्मज्ञान झालें-कीं त्यांचा लय आपोआपच होतो. ' ज्ञेय ( वस्तु ) पावलिया सम्यक । स्वरूपीं चिन्मात्रैक एक । तेथें मिथ्या व्याप्य व्यापक । साधक बाधक असेना ॥ "

( नाथ भागवत १९-१८१ )

४ **ब्राम्हण होते:—** ब्रम्ह जानाति इति ब्राह्मण: । जन्मतःच ते ज्ञानी होते.

५ **मुंज झाली नव्हती !** मुंज—उपनयन-म्हणजे धार्मिक दीक्षा ! धर्म म्हटला म्हणजे त्रिगुणी ! तो कोणाला दीक्षा देणार ? तर त्रिगुणी असेल त्यालाच ! पण बाबा तर मूलतःच त्रिगुणातीत ! तर मग त्या त्रिगुणातीतास त्रिगुणी धर्म कसली दीक्षा देणार ? बाबा त्रिगुण देहधारी भासले, तरी त्यांचा तो नाटकी वेष होता. ते वासनाबंधनयुक्त जन्मास आले नव्हते. तर वासना खंडूनच ज्ञानी अवस्थेंत - त्यांनीं स्वलीलया देह घेतला होता ! शिवाय मुंजसंस्कार झाले कीं त्याला ' द्विज '--दोनदां जन्मलेला-अशी संज्ञा देतात. पहिला योनि-द्वारा म्हणजे अज्ञानजन्य जन्म व दुसरा धर्मदीक्षा-द्वारा म्हणजे ज्ञानजन्य जन्म ! पण बाबा तर मुदलीं 'अ—ज' म्हणजे जन्मरहित ! मग अशा ' अजा'ला ' द्विज ' संज्ञा देणार तरी कोण व कशी ? श्रीकृष्णाचीही मुंज झाली नव्हती व त्यांनीं सांदीपनी गुरु केला होता. बाबांचीही मुंज झाली नव्हती व त्यांनीं 'वल्ली' गुरु केला हें उभयतांतील साम्य येथें नजरेंत भरतें.

बाबांनी मुंज करून घेऊन 'द्विज' संज्ञा घेतली नाही खरी; पण हिंदु-ब्राह्मण कुळांत जन्म घेऊन त्यांनी हिंदुत्वाची पहिली दीक्षा विधिस्नान-घेतली होती. मग त्यांनी यावनी धर्माचे आचार विचार तरी कां प्रतिपाळावे? पण बाबांच्या कृतींचे निरीक्षण केलें तर त्यांत त्यांनी हिंदु-आर्य धर्मालाच प्राधान्य दिलेलें दिसून येईल.

" हिंदू म्हणावे जरी तयांस । मशिदींत सदा निवास ॥
यवन म्हणावें तरी हुताश । अहर्निश मशीदीं ॥
" मशीदींत जात्याचें दळण । मशीदींत घंटा शंख वादन ॥
मशीदींत अग्नि संतर्पण । मुसलमान कैसे हे ॥
" मशीदींत सदैव भजन । मशीदींत अन्नसंतर्पण ॥
मशीदींत अर्घ्य पाद्य पूजन । मुसलमान कैसे हे ॥ " ७-१४-६

मग यांत बाबांनीं काय दाखविलें? **तर आर्य धर्माचीच प्रतिष्ठा!** पहिली मानवी उत्पत्ति हिंदुस्थानांतच झाली याचे ऐतिहासिक पुरावे आतां उपलब्ध होऊं लागले आहेतच! **आपला आर्यधर्म आद्य तर आहेच! तसाच तो अनंतही रहाणार!** सर्व धर्म त्याच्यातूनच निघाले; त्याच्यावरच जीव धरून आहेत व त्याच्यांतच लय पावणार! आर्य धर्माइतका सर्वव्यापी, सर्वश्रेष्ठ व सर्वमत सहिष्णु असा एकही धर्म पृथ्वीतलावर नाहीं; व प्रस्तुत अध्यायांत याचेंच दिग्दर्शन बाबांनीं केलें आहे.

" बाबा वदती मृदुवचन । '**आभाळ आलें आहे जाण** ॥
पडेल पाऊस पीकपीकोन । आभाळ वितळून जाईल ॥ " ७-१०६

(**कथा भाग** १००।८ " एकदां गावांत ग्रंथीज्वर आला. श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या लहान मुलास ताप भरला, त्याची आई घाबरून गेली व घरीं जाण्याची अनुज्ञा मागणेस बाबांकडे आली. बाबांनीं तिला धीर देऊन न भिण्यास सांगितलें व आपली कफनी कंबरेपर्यंत वर करून दाखविली. तों बाबांच्या दोन्हीं जांगांत चार गांठी टवटवून उठलेल्या दिसल्या. ")

' जोंवर **हृदयग्रंथी** फुटल्या नाहींत तोंवर सुख होत नाहीं. या हृदयग्रंथी कोट्यवधि असून त्या मोहनामक दोरीवर दिलेल्या आहेत. स्वरूपाचें अज्ञान ही ती

मोहरज्जू व तिच्यावर विपरीत भ्रहात्मक ग्रंथि पुष्कळ आहेत. त्यांत, देहादिकांच्या ठिकाणीं आत्मत्व असल्याचा निश्चय होणें ' ही मुख्य पहिली ग्रंथि तिच्याच योगानें हा संसार एवढा अवाढव्य व अनिवार झाला आहे. तशीच ' केवळ मायमात्रक जगाच्या ठिकाणीं आत्मा नाहीं ' असा होणें, ही दुसरी ग्रंथि होय. याचप्रमाणें जीव व ईश्वर निराळे, किंवा जीव परस्पर निरनिराळे इत्यादि निश्चय या सर्व ग्रंथिच होत. हें स्वरूपाचें अज्ञान अनादि कालापासून उत्पन्न झालें असून पुनः तें दुमडून ग्रंथिरूपाला आलें आहे; त्यामुळेंच पुरुष बद्ध झाला आहे. त्या ग्रंथि उलगडल्या म्हणजे बंधापासून मुक्ति होते. " ( श्रीदत्त भार्गव संवाद प्र० १० )

यावरून ' **ग्रंथिज्वर** ' हें बाबांनीं कशाचें प्रतीक केलें आहे हें उघड होतें. ग्रंथिज्वराचें मूळ कारण ग्रंथिचा प्रादुर्भाव, त्यामुळेंच ज्वर येतो पुढें भ्रम होतो व शेवटीं अंत होतो. तसेंच भव-ताप व भवभ्रम यांचें आदिकरण अज्ञान ग्रंथिक होत व त्याच आपला सत्यानाश करतात. आतां ग्रंथिज्वर जरी आपल्याला भोंवला तरी त्याचे आदि-बीज उपरें असतें म्हणजे ग्रंथिज्वराचे विशिष्ट जंतु ( Specific plague Bacilli ) आपल्या रक्तांत शिरल्यामुळेंच आपणांस ग्रंथिज्वर होतो. मूळांत आपण विशुद्ध असतों; पण त्या जंतुंच्या संसर्गानें ( Infection ) आपल्याला ग्रंथिज्वर होतो तसाच मूळांत विशुद्ध जो जीवात्मा त्याच्यावर विकल्परूप अज्ञान ग्रंथिच्या संसर्गानें भवतापाचा व भवभ्रमाचा अध्यारोप केला जातो. ग्रंथिज्वरांत मनुष्य मरतो भवग्रंथि ज्वरांत जीवात्मा मेलेला असतो म्हणजे देहाहंकार बुद्धिनें जन्ममरण पाशांत तो गुंततो व स्वस्वरूपाला पारखा होतो. ग्रंथिज्वराचे रोगी वेळींच योग्य उपचारांनी सुधारतात तसेंच भवरोगी भववैद्याच्या उपचारांनी सुधारतात ग्रंथिज्वर व भवज्वर यांतील हें साम्य झालें पण दोहोंमध्यें एक मोठा भेद आहे ग्रंथिज्वर हा मायिक आहे; तो मायिक देहाला उपाधी करतो व मायिक उपचार त्या देहालाच करावे लागतात पण अज्ञान ग्रंथि या मायिक असल्या तरी ज्या जीवात्म्यावर या उपाधी भासतात तो आत्माच अतएव मुक्त आहे म्हणून त्या आत्म्यावर उपचार

करावे लागत नाहींत तर अज्ञान ग्रंथिचाच सविकल्प ज्ञानरूपी उपचारानीं निराळा करावयाचा असतो. व हाच भेद दाखविण्यासाठीं बाबानी आभाळाचा दृष्टांत घेतला आहे.

आकाशाप्रमाणेंच आत्मा पूर्ण आहे, सूक्ष्म आहे, मलरहित आहे, अज आहे व अनंत आहे; आणि तसाच तो निराकार, सर्वाधार आणि संगरहित असून सर्व चराचराच्या अंतर्बाह्य रहाणारा आहे. एक चैतन्य मात्र जास्त, तेवढें आकाशाच्या ठिकाणीं नाहीं. वस्तुत: चैतन्यपूर्ण आकाशालाच आत्मा असें म्हणतात ............ स्वत: चैतन्याच्या दृष्टीनें तें परिपूर्ण आत्मस्वरूप आहे ............परम शुद्ध संवित् एकटी एकच आहे तिचें स्वरूप अखंड एकरसच आहे. पण मायेच्या योगानें ती स्वरूपाचा संकोच करून अनेक मर्यादित रूपानीं भासते हे मायेचे आवरणही लोकांच्या मर्यादित दृष्टीनें भासते मर्यादित पदार्थांच्या ठिकाणीं 'अहं' असा अभिमान धरणें, हाच चैतन्याला परिच्छेद. (पहिली अज्ञान ग्रंथि) त्या भावनेला पूर्णत्व नसल्यामुळें त्यालाच 'अविद्या' असें नांव देतात." (श्री. द. भा. सं. प्र. १८)

बाबांनी आभाळाच्या दृष्टांतानें हेंच सुलभ केलें आहे. 'आकाश' ह्या शब्दाचा अर्थ नीट समजून घेतला पाहिजे. 'आकाश' म्हणजे अवकाश, जागा Space हा त्याचा तात्त्वीक अर्थ आहे. व्यवहारांत आपणांस जें बाहेर नील-छत्र-गगन दिसतें त्याला 'आकाश' म्हणतों, व म्हणून शास्त्रांतील घटाकाश, मठाकाश, चिदाकाश इत्यादि शब्दांचा आपल्यास अर्थबोध होत नाहीं व आपण घोंटाळतों, 'आकाश' शब्दाचा 'जागा' असा अर्थ घेतला कीं, घट-म्हणजे भांडें त्यांतील जी जागा तें घटाकाश मठ म्हणजे घर त्यानें व्याप्त जी जागा तें मठाकाश व सर्व चराचर व्यापून टाकणारी जी जागा तें चिदाकाश! मग अशी जागा नसते कोठें? तर सर्वत्रच ती आहे. चराचरांतील एकहि अणुरेणु असा नाहीं की, जो अशा आकाशानें व्याप्त नाहीं. आकाशांतून सर्व चराचर भासमान झालें; आकाशांतच तें स्थिरावलें व आकाशांतच तें लय पावलें. पण हें अनुभवास पटेल केव्हां? तर मायाभ्रम - संकोचित दृष्टि निरसेल तेव्हां! मायाभ्रम हेंच आभाळ! वस्तुत: निळाकाशांतच ढग-आभाळ-

येतात; पण आपण व्यवहारांत म्हणतों; 'आभाळ आलें; त्यानें आकाश व्यापून टाकलें !' पण लगेच पाऊस पडतो; आभाळ वितळतें आणि परत नीळाकाश आपणांस जसेंच्या तसेंच दिसतें. तसेंच आभाळ एकदेशीय येतें; पण आपल्या संकोचित दृष्टी-मुळें त्यानें सर्व आकाश व्यापलेलें दिसतें; म्हणजे समजा आपण पुण्यांत आहोंत; तेथें आभाळ आलें आहे. आपल्याला तेथील सर्वच आकाश आभाळानें व्यापलेलें दिसतें, पण त्याच वेळीं मुंबईत आकाश निरभ्र असतें. पुणें-मुंबईला व्यापणारें आकाश एकच पण संकुचित दृष्टीला एके ठिकाणीं तें सर्वच आभाळग्रस्त दिसतें तर दुसऱ्या ठिकाणीं तें सर्वच निरभ्र दिसतें. तद्वतच मायेच्या आवरणामुळें आपल्या संकुचित दृष्टीला व्यक्ति निरानिराळ्या दिसतात, धर्म निरनिराळे दिसतात, देव निरनिराळे दिसतात, हाच भवताप, हाच भवभ्रम, हाच अज्ञानग्रंथिज्वर ! ह्याच अज्ञानामुळें व्यक्तिद्वेष, जाति-द्वेष, धर्मद्वेष इत्यादि दृढमूल झाले आहेत.

"भितां किमर्थ ऐसें वदून । कफनी कंबरेपर्यंत उचलून । दाविते झाले सकळ लागून । ग्रंथि टवटवून उठलेल्या ॥ " ७–१०७

हे द्वेष-आभाळ-भासतात कोठपर्यंत ? तर मायावरणामुळें आपली दृष्टि संकुचित आहे तोंपर्यंतच ! एकदां हें मायेचें आवरण - भ्रम दूर झालें, **कफनी वर केली** कीं, एकमेव साईपरमात्म्याच्या अंगावरच ह्या सर्व अज्ञानग्रंथि खेळतात हें आपल्यास पटून सर्व व्यक्तींना, सर्व जातींना, सर्व धर्मांना व्यापून उरलेलें असें एक चित्तत्त्वच दिसून येतें; आपला भ्रम दूर होतो; अज्ञानग्रंथि फुटतात; आभाळ ओसरतें; आणि आपला भवताप जाऊन आपण गगनोपम अशा चित्तत्त्वांत समरसून चिरंजीव होतो, व आपणाला कळतें कीं,

'जें सृष्टि पूर्वीं अलिप्त । तेंच सृष्टि उदयीं सृष्टी आंत ॥
महत्तत्वादि देहपर्यंत । तत्त्वीं अनुगत तीच वस्तु ॥ २२८
'आणि सृष्टिच्या स्थितिविशेषीं । गुण कार्यांतें तेंचि प्रकाशी ॥
'शेखीं गुण कार्यातें ग्रासी । उरे अवशेषीं ते वस्तु ॥ २२९

मेघापूर्वी शुद्ध गगन । मेघास बाह्य गगन जाण ॥
मेघ विराल्या गगनी गगन । अलिप्त जाण संचलें ॥ २३१
तेवी उत्पत्ति स्थिति प्रलयांतीं । वस्तु संचली अलिप्त स्थिति ॥" २३२
( नाथ भागवत अ॰ २० )

हें आत्मज्ञान आपल्याला अपरोक्षत्वें प्रत्ययास आलें कीं, आपली वृत्ति 'भूतीं भगवंत' अशी होते. व धर्मद्वेष, जातिद्वेष, व व्यक्तिद्वेष, यांचा लय होतो. आपली सर्वत्र समदृष्टी होते.

म्हणजे प्रस्तुत ग्रंथिज्वरांच्या कथेंत आपल्या हिंदु-यावनी संमिश्र वागणुकीचा समदृष्टि बोध बाबांनीं करून दिला. पण तत्त्वज्ञानांत जितका तो सुगम आहे. तितकाच व्यवहारांत तो दुर्गम आहे; व हें बाबांच्याही ध्यानांत आलें आहे. व्यवहारांत 'मी, माझे आप्त, माझी जात, माझा धर्म' इत्यादि 'आपले'पणांनीं सर्वांस इतकें मोहिलें आहे कीं, त्यांच्या ठिकाणीं सर्वांभुतीं सम दृष्टि जन्मोजन्मीं सुद्धां होणें जड आहे. पण म्हणून शहाण्यांनीं धीर सोडूं नये. त्यांतल्या त्यांत त्यांना सोपा मार्ग दाखवावा; व अध्यात्मांत असा सोपा मार्ग म्हणजे भक्तिमार्ग ! भक्ति म्हणजेच आदर. एखाद्याविषयीं आपल्याला आदर केव्हां वाटतो ? जेव्हां तो आपल्याविषयीं आपुलकी दाखवितो तेव्हांच ! बाबांनींही येथें तेंच केलें आहे !

**'म्हणति पहा हें भोगणें पडे । तुमचें सांकडें मजलागीं ॥ १०८**

प्रस्तुत कथेंत बाबांनीं त्या मुलाचें व पर्यायानें त्याच्या आईचें संकट निवारण केलें; पण तें केव्हां ?

'बाई जाउनि पाय धरी । निवेदन करी घडलें जें ॥ १०४

असें घडलें तेव्हां ! म्हणजे भक्त झाल्यास पाय धरल्यास-भक्ताचें संकट गुरुदेव निवारण करतो. तें कसें ? तर—

१ ग्रंथि स्वतःवर घेतो; म्हणजे त्याच्या अज्ञान ग्रंथीचें ज्ञान-विज्ञानयुक्त निरसन करून त्याला मुक्त करतो.

२ त्याच्या नियतीचें उल्लंघन करतो. विधिलिखीत टाळूं शकतो.

३ त्याचें प्रारब्ध भोग सुसह्य करतो.

म्हणजे सर्वसामान्य जरी प्रारब्ध अढळ असलें, व 'प्रारब्ध कर्मणां भोगादेव क्षयः ।' या न्यायानें तें भोगूनच संपत असलें; तरी सद्गुरु तें सौम्य करूं शकतो किंवा त्याची दिशा बदलूं शकतो. उदाहरणार्थ, प्रारब्धानुरूप श्री. खापर्ड्यांच्या मुलाला ग्रंथिज्वर येणार होता, त्याच्या वयप्रकृतिमानानें तो त्याला असह्य झाला असता. त्याच्या जीवाला त्यांत दगाहि संभवला असतां; पण बाबांनी त्याला सोसेल अशा पुरताच ज्वर दिला–प्रारब्ध जाणविलें; व बाकीचा भोग आपण भोगला किंवा मार्कंडेय, सत्यवान, गुरुचरित्रांतील भक्त दत्त इ. प्रमाणें बाबांनीं त्यांच्या पुढच्या जन्मींचें आयुष्य त्याला ह्याच जन्मीं देऊन वांचविला. कांहिंही ध्या, अर्थ एकच. बाबांनीं त्याचें गंडांतर टाळलें, ह्याला कांहीं त्यानें प्रत्यवाय येत नाहीं. पण ह्यांत एक मोठी गोम आहे ती ही कीं, व्यवहारांत एकावेळीं एकच गोष्ट संभवते व त्यावेळीं अन्य परिस्थितींत ती गोष्ट अन्य रितीनें झाली असती कीं नाहीं ह्याचा प्रत्यय आपणांस घेतां येत नाहीं व कालगतिप्रमाणें तो मिळणें शक्य नाहीं. शिरडींत बाबांच्या सांन्निध्यांत त्यावेळीं त्या मुलाला ग्रंथिज्वर आला म्हणूनच तो निभावला. एवढेंच आपल्याला दिसतें; पण त्यावेळीं तो मुलगा शिरडींत नसता तर काय झालें असतें हें कांहीं आपल्या प्रत्ययास येत नाहीं ! व ह्यामुळेंच 'निश्चित वाद' किंवा 'अढळ प्रारब्ध वाद' बळावला आहे.

बाह्यतः 'निश्चितवाद' व 'अनन्य भक्ति' यांत फरक नाहीं; पण तत्त्वतः त्यांत सूक्ष्म भेद आहे व तो आत्मोन्नतीस अतीव महत्त्वाचा आहे. 'ललाटरेषा कधीं पालटेना ।" हा 'निश्चितवादाचा' सिद्धांत आहे. म्हणजे आतां या क्षणीं जे होत आहे, तें तसें होणार हें पूर्वींच ठरून गेलेलें होतें, त्यांत अणुमात्र सुद्धां बदल होणें नाहीं व तो कोणाला करतां येणें शक्य नाहीं. हा तत्त्ववाद ग्राह्य मानला कीं, आत्मोन्नतीचें मूळच खुंटलें ! मग जगांत नीति, अनीति, पाप-पुण्य, चांगलें-वाईट इत्यादि कांहींच मानण्याचें कारण नाहीं. कोणाला कोणीं उपदेश करण्याचें कारण नाहीं, सद्गुरूंची, देवाधर्मांची जरूर नाहीं ! जो जें करतो तें तो करणारच.

॥ श्री साईबाबा प्रसन्न ॥

## श्री गुरुपौर्णिमा उत्सव शके १८६४ सन १९४२

यंदा जागतिक युद्ध परिस्थितीमुळें प्रवास फार अडचणीचा झाला असोनही मुंबई, पुणें, नागपुर, ठाणें, व मद्रासकडील बरेच भक्त उत्सवास आले होते.

उत्सवास प्रारंभ ता. २६-७-४२ रविवार रोजीं झाला. या दिवशीं नियमित कार्यक्रमाव्यतिरिक्त चहाफराळ माध्यान्ह आरती नतंर भोजन. दोन प्रहरीं श्रीमंदिरांत संस्थान गवई यांचे कीर्तन व रात्रौ रथाची मिरवणूक झाली.

ता. २७-७-४२ सोमवार उत्सव दिवस-या दिवशीं नियमित कार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी ८ ते १० अभिषेक, लघुरुद्र, विष्णूअर्चन, पूजा, दहा ते अकरा श्रींचे समाधीस पंचामृत अभ्यंग मंगल स्नान व वस्त्रार्पण झाले. या दिवशीं प्रत्येक भक्तास श्रीचे समाधिवर नवे वस्त्र अर्पण करून तें दुसरे दिवशीं श्रीगुरुचा प्रसाद म्हणून भक्ताची इच्छा असल्यास परत देणेची वहिवाट आहे त्याप्रमाणें बरेच भक्तांनीं वस्त्रें अर्पण केलीं व नंतर तुळशी, फुलें, हार, शेले, चादर, भक्तांनीं वाहिले. नंतर महानैवेद्य माध्यान्ह आरती, अष्टकें प्रदक्षिणा वगैरे उपासना झाल्या. नंतर भोजन समारंभ झाला. सायंकाळीं ५॥ ते ८ पर्यंत संस्थानचे सन्माननीय ट्रस्टी श्री. रा. सा. यशवंतराव गाळवणकर यांचें ( क्षणा, क्षणा, हाचि करावा विचार ) या श्री तुकोबाच्या अभंगावर सद्‌गुरु,सद्‌गुरुभक्ती, वगैरे विषयावर अतिशय मार्मिक व रसाळ कीर्तन झालें. रात्रौ श्रींचे पालखीची मिरवणूक झाली. मिरवणूकींत गारुड, भारुड, भजन वगैरे झालें. (श्री साईदास मंडळ पुणें) यांचे श्रींचे द्वारकामाईंत, पालखी नंतर भजन झालें.

ता. २८-७-४२ मंगळवार नियमित कार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळीं १० ते १२ पर्यंत श्रीगोपालकाला कीर्तन संस्थान गवई यांचे झाले नंतर माध्यान्ह आरती, तीर्थ प्रसाद व नंतर भोजन समारंभ झाला. प्रथम पाहुणे मंडळी व नंतर गावांतील लोक असा कार्यक्रम होता. याच दिवशीं गोरगरीबांस ( महार, मांग, भिल्ल, वडार रामोशी वगैरेस भंडारा भोजन देणेंत आलें. भोजन समारंभ कै. दिक्षित यांचे वाड्यांत उरकणेंत आला. या वाड्यांत नवीन तयार केलेल्या स्वयंपाक घराची सोय व त्या स्वयंपाक घरालगत नवीन विहिरीची सोय झालेमुळें स्वयंपाक, पाणी, कोठी,

भोजन अशा सर्व गोष्टी एकाच जागी उत्तम तऱ्हेनें उरकता येऊं लागल्या आहेत, व स्वच्छताही उत्तम रहाते.

रात्री संस्थानचे सन्माननीय ऑडीटर श्री. भास्करराव वरेरकर यांची कन्या कु. यमुनाबाई यांनी श्रींचे पुढें ( यमन, पडदीप ) वगैरे रागांतील चिजा म्हटल्या. शेवटी ( तुमबीन मेरी कौन खबर ले) हे पिलू रागांतील भजन अतिशय उत्तम म्हटले त्यांचा आवाज व मधूर गाण्याची पद्धतही फारच चांगली आहे. त्याना श्रींचा प्रसाद नारळ संस्थानचे चिटणीसांचे हस्तें देणेंत आला.

उत्सवांत एकंदर १००० ते १५०० भोजन पात्र व ४०० ते ५०० गोरगरीबांस भन्डार भोजन इतकें अन्न संतपर्ण झालें व सेवेकरी, नोकर व इतर स्थानिक वर्ग ज्यांनीं उत्सव कार्यात अंगमेहनत केली त्यांस आर्थिक मदत देण्यांत आली.

उत्सवाची व्यवस्था, यन्दापासून उत्सव मंडळ नेमून उरकणेची पद्धत कमिटीने सुरू केलेप्रमाणें कोठीची व्यवस्था संस्थानचें सन्मानीय दु. चि. दत्तात्रय दामोदर ऊर्फ नानासाहेब रासने पुणें यांनीं उत्तम तऱ्हेने ठेऊन व इतर देखरेख संस्थानचे सन्माननीय ट्रस्टी श्री. तात्याबा पाटील कोते, श्री. र. भा. पुरंदरे व श्री. रा. वा. चैसास यांनीं ठेऊन उत्सवकार्य फारच उत्तम तऱ्हेनें पार पाडलें.

येणेप्रमाणें श्रीसच्चिदानंद सद्गुरू अधुनिक संत चुडामणि श्रीसाईबाबा महाराज शिर्डी यांचा चालूसालीं श्रीगुरुपोर्णिमेचा उत्सव झाला, व त्यांत ज्या ज्या भक्तांनीं समक्ष हजर राहून किंवा द्रव्यव्दारें मदत केली त्या सर्वांचे व त्यांचें कुटुंबियांचे सर्वतोपरी संरक्षण करणार श्रीसमर्थ आहेतच.

श्रीसाईबाबा शि. सं. कमिटीमार्फत,

श्रीसाई सेवक

**श्री. ना. खारकर**

ऑ. चि., शि. सं. क.

# गुरूपौर्णिमा उत्सव.

श्रीगुरु पौर्णिमा शके १८६४ चे उत्सवाचे जमाखर्चाचा ऑगस्ट सन १९४२ अखेरचा अहवाल पुढील प्रमाणें आहे:—

| जमा. रु. आ. पै | | खर्च. रु. आ. पै | |
|---|---|---|---|
| ४१-१४-९ | श्रीचे पेट्या वसुली | १४९-१३-० | श्री. खजिनदार मार्फत |
| ३८७- ८-० | श्री. चिटणीस मार्फत वसुली | ४०७- ०-६ | श्री. उत्सव व्यवस्था मण्डळ मार्फत |
| ५८-६ -० | श्री. मॅनेजर मार्फत वसुली | २४- ६-० | कोठी कारकून मार्फत |
| ३००- ६ ० | श्री. खजिनदार मार्फत वसुली | | |
| ५८- ८-० | श्री. दुय्यम खजिनदार मार्फत वसुली | ५८१- ३-६ | एकूण खर्च |
| ६१- ७-० | श्री. सामान विक्री वसुली | ३२६-१४-३ | शिल्लक संस्थान खाते जमा |
| ९०८- १-९ | एकूण जमा | ९०८-१-९ | |

श्री. ना. खारकर,
ऑ. चिटणीस.

## श्रीसाईबाबांचे शिरडी संस्थानांतील जीर्णोद्धाराचे कामाचा अहवाल लीला अंक ७, ८, ९ व १० वर्ष शके १८६३ मध्ये पान ४०४ ते ४१० वर प्रसिद्ध झालेला आहे त्याची पुरवणी.

॥ श्री साई बाबा ॥

शिरडी संस्थानांत जिर्णोद्धाराची कामें कमिटीचे अनुज्ञेप्रमाणें मागें पुरी केली व त्या संबंधीच्या ता. १२-१२-१९४१ च्या अहवालाचा कमिटीनें आपले ता ३०-१२-४१ चे सभेचा ठ. नं. ५ स्वीकार केलाच आहे.

त्यानंतर सोईचे व आरोग्याचे दृष्टीनें संस्थानांत जरूरीची कामें उरकणेचे नवीन काम चिटणीस यांजकडे कमिटीनें सोपविलें होतें त्या कामास सुरवात होऊन जरूरी प्रमाणें वेळोवेळीं मागणी केले प्रमाणे आतांपर्यंत अंदाजे रक्कम रु. ३००० चे खर्चास कमिटीने मंजुरी दिलेली होती.

या नवीन कामास ता. ३०-१२-१९४१ ला सुरवात होऊन ता. ४-७-१९४२ ला बरसातीमुळें या पुढें ही कामें होणें शक्य नसलेमुळें तूर्त काम बंद झालें आहे, आरंभिलेली बहुतेक सर्व कामें पुरी झाली आहेत व ती चालू असतांना सर्वांनी वेळोवेळी पाहिली आहेतच.

हीं कामें व मागील जिर्णोद्धाराची कामे ज्या मुंबई बाजुचे मेस्तरी मार्फत करून घेतली त्यांचेच मार्फत करून घेणेंत आली व या कामी पूर्वी प्रमाणेच संस्थान नोकर श्रीयुत बाळा गुरव याचा, माल खरेदी, हिशेब ठेवणें वगैरे सर्व बाबतींत फारच उपयोग झाला. त्याचप्रमाणें संस्थानचे वयोवृद्ध स्थानिक ट्रस्टी श्री. तात्याबा गणपतराव पाटील कोते यांचा सर्व कामांत व विशेषतः दिक्षीत वाड्यांतील आड व लेंडी बागेंतील मोठा आड या कामीं फारच उपयोग झालेला आहे. किंबहुना हीं कामें त्यांचे सारखे या बाबतींतील अनुभवशिर सल्याशिवाय उरकता आली नसती.

### झालेली सर्व साधारण कामें:—

१. दिक्षीत वाड्यांत, ४ सिंगल खोल्या, आड व त्याचे शेजारी फरशीची पडवी, त्याचे कोपऱ्यांत लहानसा शौचकूप व त्या पलीकडे पत्र्याची

मोठी शेड व कंपाउंडाच्या भिंती, त्या पलीकडील जुन्या खोल्यांत मोरी संबंध पडवीस फरशी, पडवीवरील कौलें व छप्पर दुरुस्ती व स्वयंपाक खोली मोठी करणे, माडीवरील हॉलला दोन खिडक्या व पश्चिम बाजूस चार खिडक्या वगैरे.

२. मशिदींत बाबाचे तैल चित्रांची नवीन फ्रेम कांचेसह तयार करणे.
३. चार शौचकूप नवीन बांधणें व गटार वगैरेची उत्तम सोय करणे.
४, लेंडी बागेंत मोठा आड खोदून तयार करणें फक्त बांधकाम होणेचें आहे बागेंतील मांडव सुधारणा साफ सफाई व कुंपणाकरिता बियाची सभोंवार लागवड,

५ समाधी मंदीरांतील आडाची किरकोळ दुरस्ती व रहाट बसविणें.
६. या शिवाय इतर किरकोळ दुरस्तीची कामें वगैरे, फक्त रस्ता दुरस्तीपैकीं सगुणचे दारा समोरील रस्त्याला बांधीव मोरीचे काम व लेंडी बागेंतील मोठे आडाचे बांधकाम ही तूर्त राहिलीं आहेत. बरसातीनंतर उरकणेंत येतीलच.

७. शिवाय याच कामांत लेंडी बागेंतील पाराचे काम झालेले आहे व त्याकडे लागलेले खर्चाचा अंदाज मेस्त्रीचे एस्टीमेट प्रमाणें रा. रा. य. ज. गाळवणकर यांचेकडून संस्थानास जमा झालेला आहे.

बहुतेक सर्व माल मसाला खरेदी व मजुरी चुकती करणे श्री. बाळा गुरवचे मार्फत मेस्त्रीचे सांगणेप्रमाणें झालेली सामानाची खरेदी, सुतार मजुरी प्रवास खर्च वगैरे मेस्त्रीमार्फत चुकती झालेली आहे.

श्री. बाळाचे व मेस्त्रीचे हिशेबावरून या सर्व कामाप्रीत्यर्थ आतांपर्यंत झालेला खर्च पुढें दिलेप्रमाणें आहे व तो तपासून पाहून चुकता केलेला आहे.

३७. चरई रोड.
ठाणें, ता. १-९-४२

श्री. ना. खारकर.
ऑ. चिटणीस.

# शिरडी संस्थानांतील जीर्णोद्धाराचा अहवाल

श्री साईबाबा शिरडी संस्थानांत, नवीन कामांस सुरवात ता. ३०-१२-४१ ला होऊन ती कामें ता. २-७-४२ पर्यंत चालू होती. त्यानंतर किरकोळ कामांचा उरक ता. १०-७-४२ पर्यंत चालू राहून ही कामें पूर्ण बंद झाली. याप्रीत्यर्थ पुढील प्रमाणें खर्च झाला:—

| तारीख | रक्कम रु. आणे. पै. |
|---|---|
| ता. ३०-१२-४१ ते ता. २-७-४२ | ३१४९-८-६ |
| ता. ३-७-४२ ते ता. १०-७-४२ | २७-३-० |
| एकूण खर्च | ३१७६-११-६ |
| पोटीं पाराचे कामाचे खर्चाची रक्कम रा. सा. य. ज. गाळवणकर यांचे कडून वसूल आली ती. | २६६-१४-० |
| एकूण संस्थान मार्फत खर्च | २९०९-१३-६ |

मूळ जिर्णोद्धार अहवाल रिपोर्ट ता. १२-१२-४१ चा व हा पुरवणी अहवाल रिपोर्ट या बाबतींत थोडा जास्त खुलासा:—

ता. १२-१२-४१ चे रिपोर्टांत नमूद असलेले एकूण खर्चाचे आंकड्यापैकीं डिसेंबर १९४१ अखेर रक्कम रु. ४४४२-१५-६ चींच बिलें खर्ची पडलीं असलेमुळें सन १९४१ चे आढावा पत्रकांत इमारत खातीं खर्चाचा आंकडा तितकाच आलेला आहे व या एकूण झालेले खर्चापैकीं रक्कम रु. १५२२-१५-६ ची रक्कम सन १९४२ (चालू) चे आढावा पत्रकांत इमारतखाती पुरवणी रिपोर्टांतील एकूण खर्चाचे आंकड्यासुद्धां दाखविली जाईल.

पुरवणी अहवाल रिपोर्ट, सं. कमिटीच्या ता. २८-७-४२ चे सभेचा ठ. नं. ७ नें मंजूर करणेंत आलेला आहे व यांतील खर्चाचे मंजूर झालेले आंकड्यांत पुढील प्रमाणें शोध आहेत:—

संस्थानांतील भाड्याने दिलेल्या जागेचे दुरुस्तीकडे संस्थान कारकून यांनं खर्च केलेली रक्कम रु. २३ चिटणीसांचे मागणीप्रमाणें ता. २८-७-४२ चे सभेचा ठ. नं. ५ (३) ने मंजूर करणेत आलेली पुरवणी अहवालांतील एकूण खर्चांचे आकड्यांत आलेली असोन ता. ३-७-४२ ते १०-७-४२ पर्यंत चे किरकोळ कामांचे उरका प्रीत्यर्थ झालेला खर्च ता. ८-८-४२ ला चिटणीस यांनीं रुजु करून चुकभूल पुरी करणेंत आदा केलेली रक्कम रु. २७-३-० ही जास्त आलेमुळें पु. रिपोर्टांतील मूळ एकूण खर्चांचा आकडा रु. ३१४९-८-६ चे ऐवजी रु. ३१७६-११-६ असा समजणें.

येणेंप्रमाणें जिर्णोद्धाराची कामें सन १९४१ सालांत सुरु झालेपासून सन १९४२ ऑगस्ट अखेर या कामीं एकूण रुपये ८८१४-१३-५ इतका खर्च झाला आहे.

श्री साईलीला अंक ७ ते १० वर्ष १८ शके १८६३ पान ४१० वरील ओळ ४ मध्यें ता. ३०-२-४१ चे जागीं ता. ३०-१२-४१ असें वाचणें.

३७ चरई रोड, ठाणें
ता. १-९-१९४२

श्री. ना. खारकर
ऑ. चिटणीस

श्रीसाईनाथ प्रसन्न.

# कै. चिंचणीकर ट्रस्ट.

## शके १८६३ सालचें उत्पन्न

कै. आण्णा चिंचणकर यांच्या मिळकतीच्या उत्पन्नांतून—शिर्डी संस्थानास येणाऱ्या तीन चतुर्थांश हिश्याचा शके १८६२ साल अखेरचा हिशोब श्रीसाईलीला अंक ४-५-६ वर्ष १८ शके १८५३ चे पान ३८८ वर प्रसिद्ध केलेला आहेच. त्यापुढील त्या इस्टेटीच्या ट्रस्टकडून मिळालेला वसुलीचा हिशेब पुढील प्रमाणें आहे:—

" शके १८६३ सालांत शि. संस्थानास चिंचणकर मिळकतीचे उत्पन्नांतून खर्च वेंच वजा जातां शिल्लक राहिलेल्या रकमेंतून तीन चतुर्थांश हिशाची रकम देणें त्याचा तपशील:—

| | जमा | खर्च | शिल्लक |
| --- | --- | --- | --- |
| शके १८६३ सालांत आलेला वसूल व खर्च | ७१५-०-० | १-८-९ | ७१३-७-३ |
| शके १८६३ सालापैकीं येणें राहिलेलें वसुलीची रकम शके १८६४ सालांत आली ती सरकारधारा खर्च पडला तो | ३००-०-० | ११५-१३-९ | १८४-२-३ |
| | १०१५-०-० | ११७-६-६ | ८९७-९-६ |

तीन चतुर्थांशची रकम ६७३-८-०

आजरोजीं रकम ( ६७३-८-० ) श्री. श्री. ना. खारकर, शि. सं. प्र. सचिव ठाणें यांस समक्ष दिली.

(सही) बाळकृष्ण विश्वनाथ देव,
कै. चिंचणीकर यांचे विश्वस्तांपैकीं एक विश्वस्त.
२२-७-४२

श्री. ना. खारकर.
ऑ. चि. शि. सं. क.
३७ चरईरोड, ठाणें.
ता. १-९-४२

श्री सद्गुरु साईबाबा



# पुण्यातिथि

कृ. सा. न. वि. वि. आधुनिक संतचूडामणि सच्चिदानंद **श्रीसद्गुरु साईबाबा महाराज** संस्थान शिर्डी, ता. कोपरगांव जि. अहमदनगर यांची २४ वी पुण्यातिथि येत्या आश्विन शु॥ १० शके १८६४ सोमवार (ता. १९–१०–४२) रोजीं श्रीक्षेत्र शिर्डी येथें महाराजांच्या मंदिरांत होणार आहे. तरी या समयीं आपण कृपा करून आपल्या कुटुंबांतील बालगोपाळांसह व मित्रमंडळीसह श्रींच्या तीर्थप्रसादास अवश्य यावें अशी नम्र विनंति आहे.

**श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी मार्फत**

आपका नम्र साई सेवक,

ता. २७ सप्टेंबर १९४२
३७ चराई रोड, ठाणें.

**श्री. ना. खारकर**
ऑ. चिटणीस,
**श्री साईबाबा शि. सं. क.**

(ता. क. उत्सवांत मंगळवार ता. २०-१०-४२ रोजीं सकाळीं श्रींच्या जुन्या कपड्यांची प्रसाद म्हणून विक्री होईल भक्तांनी वेळीच हजर राहून मर्जीनुरूप याचा फायदा घ्यावा.

## —* कार्यक्रम *—

### आश्विन शु॥ ९ शके १८६४ रविवार ता. १८-१०-४२ प्रारंभदिन

नियमित कार्यक्रमा व्यतिरिक्त दोन प्रहरी कीर्तन.

### आश्विन शु॥ १० सोमवार ता. १९-१०-४२ पुण्यतिथीदिन

पहाटे, श्रींच्या समाधीवर रुद्र व पवमान अभिषेक.

सकाळी, भिक्षा नंतर समाधीस मंगलस्नान, पूजा, वस्त्रपरिधान वगैरे,

नंतर, पुण्यतिथि कीर्तन.

दुपारी पुण्यतिथि-आराधनाविधि.

रात्रौ रथाची मिरवणूक.

### आश्विन शु॥ ११ मंगळवार ता. २०-१०-४२

नियमित कार्यक्रमा व्यतिरिक्त दुपारी कीर्तन.

रात्रौ पालखीची मिरवणूक.

### आश्विन शु॥ १२ बुधवार ता. २१-१०-४२

नियमित कार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी काला कीर्तन.

दुपारी भोजन समारंभ.

**सुचना:**—वरील कार्यक्रमामध्यें जरूरीप्रमाणें फेरफार केला जाईल. बाहेरगावचे पाहुणे मंडळींची उत्सवाचे दिवसांत सर्व व्यवस्था नेहमीप्रमाणें राहील

वर्गण्या, देणग्या वगैरे संस्थानचे सेक्रेटरी, ट्रेझरर व जॉ. ट्रेझरर यांजकडे देऊन पावत्या घ्याव्यात:—

**आर. व्ही. घैसास**

ऑ. ट्रेझरर:—गोखले रोड, [नॉर्थ] दादर, मुंबई नं. १४

**डी. व्ही. खांबाटे,**

ऑ.जॉ. ट्रेझरर:—वर्तक वाडी, तेजपाल रोड, विलेपार्ले मुं. २४.

Shri Sai Baba



# Announcement

The 24th Anniversary ('Punya Tithi) Utsava of the Shake Year 1864 of Shri Sadguru Sai Baba will be celebrated, at His Shrine at Shridi, Taluka Kopargaon, District, Ahmednagar. All Sai Bhaktas are invited to attend and partake in the celebrations which will commence from Sunday the 18th October 1942 and terminate on Wednesday the 22nd October 1942.

Contributions, gifts etc. should be made through the Hon. Secretary, Treasurer and Joint Treasurer who will issue Sansthan receipts.

27 th September 1942
37 Charai Road,
THANA

S. N. Kharkar.
*Hon. Secretary.*

**Shri Sai Baba Shirdi Sansthan Committee**

R. V. Ghaisas. Hon. Treasurer
Gokhale Road, North Dadar, Bombay 14.

D. V. Sambare. Hon. Joint Treasurer
Vartak Wadi, Tejpal Road, Vileparle Bombay

N. B.—During the celebrations on Tuesday the 20 th October 1942 in the morning Baba's old clothes will be sold as Prasad. Devotees desirous to have this prasad should take the benifit of the opportunity.

# NOTICE

The Shirdi Sansthan Committee feels that they will be failing in their duty if they do not warn the S. I. devotees against the announcement appearing in the December 1941, issue of the Sai Sudha of Madras as regards the posting of Mr Adinarayan to help Madras & S. I. visitors as somebody connected with the Sansthan and that they can get whatever they want to be done at Shirdi directly through him. Everything that has to be done in Shirdi with regard to the worship &c. of Shri Sai Baba must be done through the Sansthan and their duly appointed office bearers.

There is now one more individual by name Mr. Shri Nivas Rao from Adoni who has been noticed to be connected in dexterously planned efforts to defy the courts sanctioned scheme by trying to create a dual authority in Shirdi — a perpetual source of disharmony — if not clashes which to say the least is a very queer sample of the so called devotion to the " Sayings & teachings of Sai Baba. "

27-9-42 Shirdi Sansthan Committee.

---

श्री

श्रीसाईबाबा शिरडी संस्थानच्या भक्त मंडळाची २१ वी वार्षिक सभा ता. २८-७-१९४२ मंगळवार रोजीं दुपारी ३ वाजतां शिरडी येथें दिक्षीत वाड्यांत भरली होती त्या सभेचें टिपणः-

## हजर सभासद.

१. सौ. लक्ष्मीबाई गोविंद गाडगीळ.
२. रा. रा. गो. का. गाडगीळ (बॅरिस्टर)
३. रा. रा. व. ना. गोरक्षकर.
४. रा. रा. प. ज. गाळवणकर.
५. रा. रा. ना. आ. सावंत.
६. रा. रा. मो. कृ. देसाई.
७. रा. रा. का. ह. वरळीकर.
८. रा. रा. रा. वा. घैसास.
९. रा. रा. दा. वि. सांबारे.
१०. रा. रा. मो. ना. सावे.

११. रा. रा. द. दा. रासने.

१२. रा. रा. श्री. ना. खारकर.

१३. रा. रा. तात्याजी गणपत पाटील.

१४. रा. रा. र. मा. पुरंदरे.

१५. रा. रा. वि. ब. देव.

रा. रा. मो. कृष्णाजी देसाई यांचे सूचनेस रा. रा. द. दा. रासने यानीं अनुमोदन दिलेवरून सर्वानुमते रा. रा. ब. ना. गोरक्षकर यांची अध्यक्षाचे जागीं निवडणूक होऊन त्यांनीं अध्यक्षपद स्वीकारलेवर सभेचे कामास सुरवात झाली.

ठ. नं. १. गेले ता. ८-७-४१ चे म. मंडळाचे २० वे वार्षिक सभेचे टिपण वाचले व ते सर्वानुमते मंजूर करणेचे ठरले व त्यावर अध्यक्षांची सही झाली.

सन १९४१ या सालच्या वार्षिक जमाखर्चाचा तक्ता ( आढावा ) संस्थानचे सन्माननीय ऑडिटर यानीं तपासून सही केलेला या सभेपुढें संस्थान कमिटीकडून मांडणेंत आला. तेव्हां रा. रा. मो. कृ. देसाई यानीं ठराव आणिला कीं:-

ठ. नं. २. सदरहू आढावापत्रक ऑडिटरनीं तपासून बरोबर असलेचे सर्टीफिकीट दिलेले आहे. व याच्या छापील कॉपीज सभासदांस अगाऊ पाठविलेल्या आहेतच करितां ते मंजूर करावे सदरहू ठरावास रा. रा. का. ह. वरळीकर यानीं अनुमोदन दिलेवर तो सर्वानुमते मंजूर झाला.

अध्यक्षांच्या परवानगीने,

संस्थानचे सन्मानीय ऑडिटर हे विनामोल संस्थानचे हिशेब तपासणेचे काम करीत आले आहेत करितां त्यांचे आभार मानावे व सध्याचे संस्थानचे काम वाढीमुळें त्यांस ऑनरेरियम देणेचा विचार व्हावा असा ठराव रा. देसाई यानीं मांडिले वरून अध्यक्षांनीं खुलासा केला कीं:-

आभार मानणे पुरता तुमचा ठराव घेतां येईल परंतु ऑनरेरिअम देणेची बाब ही सूचना म्हणून घेतां येईल व ही सूचना संस्थान कमिटीचे अधिकारांतील आहे व त्या कमिटीस ही गोष्ट योग्य वाटून त्या कमिटीनें आपले गेले ता. २८ जूनचे सभेंत या प्रमाणें ठराव करून ऑडिटरांस वार्षिक रु. १०१चे ऑनेररिअम देणेचे ठरविलेले आहेच.

ठ. नं. ३. नंतर "ऑडिटरांचे आभार मानावे" या रा. देसाई यांचे ठरावास रा. वरळीकर यांनीं अनुमोदन दिलेवर तो ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

या नंतर अध्यक्षांनीं सभेस विनंती केली कीं:-

आढावापत्रकावरील सं. क. चे रिपोर्टाचे शेवटचे पॅरांत नमूद केलेले परिस्थितीचा भ. मं हजर सभासदांनीं जरूर विचार करून भ. मं. चे तरूण उत्साही वगैरे सभासद मिळवून हल्ली भासत असलेली उणीव दूर करणेचे मनापासुन प्रयत्न करावें.

ठ. नं. ४. अखेर अध्यक्षांचे आभार मानणेचे रा. साठे यांचे सुचनेस रा. देव यांनी अनुमोदन दिलेवर सर्वानुमते आभार मानण्यांत आले.

इतके काम झालेवर अध्यक्षानी सभा बरखास्त झालेचे जाहीर केलें.

**श्री. ना. खारकर,**
ऑ चिटणीस,
श्रीसाईबाबा शिरडी संस्थान,
२८-७-१९४२.

## भक्तमंडळास विनंतीः—

ज्यानी अजून १९४० ते ४२ पर्यंतची वर्गणी दिली नसेल त्यांनी आपले नांव राखण्याकरितां वर्गणी लवकर पाठवावी. इंग्लीश रूलबुक किंमत ३ आणे. मराठी ६ आणे.

श्रीसाईबाबा प्रसन्न.

# श्रीगोकुळाष्टमी उत्सव १९४२.

ता. २-९-४२ बुधवार रोजीं रात्रौ १२ वाजेपर्यंत कृष्णजन्म कीर्तन संस्थान-शबई यांचे झाले. ता. ३-९-४२ गुरुवार रोजीं श्रीस पंचामृत अभ्यंग मंगलस्नान महानैवेद्य, दुपारीं माध्यान्ह आरती नंतर अन्नदान ( भंडारा ) गुळशिरा. भोजनास अजमासें मंडळी १०० होती. रात्रौ चावडी व रथाची गावांतून मिरवणूक. ता. ४/९/४२ शुक्रवारीं सकाळीं गोपालकाला कीर्तन. एक दिवस श्री. द. दा. ऊर्फ ( नानासाहेब ) रासने, मु. पुणेंकर यांचें कीर्तन झालें. कीर्तनास संस्थानचे ट्रस्टी श्री. तात्या बाबा कोते पाटील, श्री. बापूराव रावोजी बोरावके, श्री. तुकाराम रावोजी बोरावके वगैरे मंडळी आली होती. येणेंप्रमाणें उत्सव थाटांत व आनंदानें झाला.

## उत्सव वसुली व खर्चाचा तपशील.

| जमा | | खर्च | |
|---|---|---|---|
| २५—०—० | संस्थानकडून वार्षिक देणगी | ३०—४—३ | एकुण खर्च हस्ते सं. कारकून |
| ५—८—३ | चिटणीसमार्फत वसुली | | |
| १२—८—० | मॅनेजरमार्फत वसुली | | |
| ४३—०—३ | | ३०—४—३ | |

शिल्लक रकम रुपये १२-१२-० संस्थानास दिली.

( सही ) तात्याजी गणपत पाटील कोते.

,, दत्तात्रय दामोदर रासने;

उत्सव साजरा करणार.

# शिरडी वृत्त.

## जून १९४२

या महिन्यांत मुंबई, मद्रास, नेल्लोर, धर्मावरम्, रायपेट्टा, हुटगी, पुणें बल्लारी, मनमाड, ठाणें, सिकंदराबाद, येवला वगैरे गांवचे भक्त श्रींचे दर्शन घेऊन गेले.

## धर्म कृत्यें

नेहमींप्रमाणें भक्तांचे अभिषेक अर्चनें झालीं.

संस्थान नोकर, सेवेकरी व श्री. तात्या पाटील, श्री. रामचंद्र पाटील वगैरे व पाहुणे मंडळीस अंबरसाचे भोजन झालें (एकूण पात्र पाऊणशें झालीं)

अधिकमासाप्रीत्यर्थ चार मंगळवारी व चार शनिवारी श्रीस व शनि महाराज यांस अभिषेक व अधिकमास समाप्तीप्रीत्यर्थ श्रीस महानैवेद्य व ५ ब्राह्मण सुवासिनींस पुरणपोळीचें भोजन श्री. नानासाहेब खारकर यांनीं दिलें.

## कीर्तनें

श्री. ह. भ. प. ताहराबादकर बुवा यांचे श्रीचे मंदिरांत ता २३।६।४२ रोजीं रात्रौ सुश्राव्य कीर्तन झालें. बुवांचा संस्थानकडून चहा भोजन व एक रुपया नारळ देऊन गौरव करणेंत आला.

संस्थान गवई यांचीं दोन कीर्तनें झालीं.

## नवल विशेष

श्री. कै. दिक्षित वाड्यांत मागील बाजूस नवीन संडास, मोरी, पत्र्याची शेड वगैरे सर्व बांधून होऊन त्यास रंग वगैरे देऊन तयार झाले.

लेंडीबागेंत चार नवीन संडास बांधून त्यास रंग वगैरे देऊन तयार झाले.

दिक्षीत वाड्यांत आंतील पडवीस शहाबाद फरशी बसविणेचें काम व पुढील पडवींत जमिनीचे काम हीं कामेंही पुरी झालीं. श्रीसमाधि मंदिरांतील विहिरीवर रहाटाची दुरुस्ती नवीन खांब बसवून झाली. इतर किरकोळ दुरुस्त्या ही बऱ्याच झाल्या.

चालू महिन्यांत पाऊस फार झालेमुळें लेंडी ओढ्यास दोन मोठाले पूर आले सर्व लेंडीबाग जलमय होऊन लेंडीबागेंतलि नवीन विहिर पाण्यानें तुडुंब भरून गेली होती. तूर्त बागेंतील विहिरीचें काम बंद आहे.

शिर्डीचें हवापाणी उत्तम असोन मृगनक्षत्राचा पाऊस नेहमींपेक्षा यंदां पुष्कळच झाला.

## जुलै १९४२

या महिन्यांत मुंबई, पुणें, ठाणें, नगर, हैद्राबाद, सिकंदराबाद, मद्रास, अनंतापूर, बेंगळूर, शिव, गुंटूर, अंधेरी, विलेंपारलें, वांद्रा, सांताक्रूझ, नागपूर, औरंगाबाद, बळारी, पेनुकोंडा, वालाजापेठ, बेझवाडा वगैरे गांवचे बरेच भक्त श्रींचे दर्शनास येऊन गेले.

### देणगी.

श्री. एस्. बी. केशवय्या. सबरजिस्ट्रार, पेनुकोंडा, एक धोतर पान हात सहा हिरवी किनार.

श्री. चंदनमल्ल आनंदराम, शिर्डी, श्रीचे गुरुवारचे पंचामृत स्नानाचे वेळीं समोर पडदा बांधणेचा ( रंग हिरवा ) खादीचा, श्री. सभापती मुदलीयार, सिकंदराबाद, ( उशी ) मखमली नक्षीकाम केलेल्या आभ्यासह व कापडी हिरवी फीत लावलेला पंखा.

(श्रीसाईदास मंडळ) बुधवार पुणें, श्रीगुरुपोर्णिमेनिमित्त जरीकांठी उपरणें ( कोईमतुरी )

श्री. त्रिंबक गोविंद जोशी, कोकमण्ण, साधे सुती पिवळेकांठी उपरणें श्री. रंगनाथ वामन ठाकूर, बॉम्बे प्रेम वर्क्स १८९ पुणें, लक्ष्मी रोड, चौकटी-सह लहान श्रींचा फोटो. श्री. रामचंद्र दशरथ चौथे, शुक्रवार पेठ ३१९ पुणें हातरुमाल. श्री. सौ. अनुसयाबाई सखाराम चौधरी, शनिवार पेठ ३९२ पुणें एक साधा चोळखण. श्री. सौ. शांताबाई हरिभाऊ मंत्रे, बुधवार दत्तमंदीर पुणें, एक पागोटें ( तांबडें सुती ) श्री. दत्तदास माडयेबुवा मुंबई, चंदन मुसा पांच रत्तल. श्री. सौ. इंदिराबाई पुरुषोत्तम लेले, दादर, चांदीचा डावा पाय, ( भार ॥= दहा आणे ) कु. कमलाबाई रामचंद्र सामंत, वांद्रे, चांदीची उभी डबी ( वजन १॥ भार )

याचप्रमाणें सं. क. चे सभासद डॉ. के. व्ही. साबे यांनी येणारे भक्तांचे उपयोगाकरितां फर्स्टएडची व इतर उपयुक्त पेटंट औषधें व त्यास लागणारे साहित्याची एक पेटी संस्थानचे उपयोगाकरितां दिली.

## धर्म कृत्यें.

नेहमींप्रमाणें भक्तांचे अभिषेक, अर्चन वगैरे झालीं मुंबईकडील श्री. दत्तदास माडये बुवा यांचे श्रींचे मंदिरांतील पादुकांस व निंबवृक्षाखालीं पादुकांस पांच दिवस दुधाचे अभिषेक झाले व एक दिवस श्रींस नैवेद्य व गोर-गरिबांस अन्नदान झालें.

श्री. रा. सा. यशवंतराव गाळवणकर वांद्रा यांनीं लेंडीबागेंतील पारा-वरील पादुकांस पूजा अर्चा नैवेद्य व पार बांधून तयार झाला त्याप्रीत्यर्थ अन्नदान ( लाडवाचें ) सर्वत्र मंडळीस दिलें.

श्री. विष्णू गोविंद देव, रिटायर्ड रेंजर, संगमनेर यांची श्रीसत्यनारायण पूजा ता. २८।७।४२ रोजीं सायंकाळीं झाली.

## कीर्तन व इतर कार्यक्रम.

या महिन्यांत संस्थान गवई यांची चार, श्रीनानासाहेब रासने यांचे एक श्री. रा. सा. यशवंतराव गाळवणकर वांद्रा, यांचे श्रीगुरुपौर्णिमेचे दिवशीं सायंकाळीं तीन तास सद्गुरु या विषयावर सुश्राव्य अशीं कीर्तनें झालीं ता. २८।७।४२ रोजीं रात्रौ श्री. कु. यमुनाबाई भास्करराव वरेरकर, मु. शिव यांनी श्रींपुढें गायनाची हजिरी दिली. यमन, पटदीप, वगैरे रागांतील चीजा व शेवटीं मिराबाईकृत 'तुमबिन मेरि' हें भजन फारच उत्तम झाले.

## नवल विशेष.

श्री. कै. माधवराव देशपांडे ( शामा ) व श्री. कै. बाळासाहेब भाटे अशा दोन जुन्या साईभक्तांचें फोटो श्रीमंदिरांत कायमचे लावणेंत आले.

बांधकामें बहुतेक उरकली असोन राहिलेलीं तूर्त पाऊसामुळें बंद आहेत.

श्रीगुरुपौर्णिमा उत्सव ता २६।७।४२ पासून तीन दिवस उत्तम तन्हेनें झाला, उत्सवात अन्नदान बरेच झाले. इतर कार्यक्रमही उत्तम झाले. चालू साली महर्गतेमुळें भक्तमंडळी थोडीशी कमी आली होती. तथापी जे नेहमी येणारे ते आलेच होते, उत्सव अहवाल निराळा दिला आहेच.

आषाढ शु. ११ चे दिवशीं श्रींच्या पालखीची गावांतून मिरवणूक झाली.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून पाऊस व पिकें उत्तम आहेत.

## ऑगस्ट १९४२

या महिन्यांत सिकंदराबाद, राजमहेंद्री, अडोनी, करनूल, मद्रास, बंगलूर बल्लारी, बेळगाव, अनंतापूर, कोकोनाडा, सेंद्रमंगल, म्हैसूर वगैरेकडील भक्त श्रींचे दर्शनास येऊन गेले.

## देणगी

श्री. एस्. रंगस्वामी c/o संजिवप्पा अँड सन्स, अडोनी, रेशमी सतरंजी ( ल्हानशी ).

श्री. व्ही. पूर्णप्राज्ञ मु. राजमेहेंद्री, चांदीच्या पादुका जोड १ वजन ( ५ पांचभार )

श्री. रघुनाथ सखाराम मांडे वैद्य, चाळीसगांव, रुईफुलीकांठी उपरणें पान १.

श्री. के. एस. स्वामीनाथान्, मु. इग्मोरा, चांदीचे बारीक पंजे २ व पावलें दोन ( वजन .।।।. बारा आणे भार )

## धर्म कृत्यें.

अभिषेक अर्चनें वगैरे धर्मकृत्य नेहमीं प्रमाणें झाले.

## कीर्तनें.

आषाढ व॥ ११ स श्री. नामदेव पुण्यतिथी निमित्त, श्रीसांवतामाळी पुण्यतिथी निमित्त, श्रावण शु. ११ स अशी संस्थान गवई यांची चार कीर्तनें झालीं. ( श्री. द. दा. उर्फ नानासाहेब ) रासने, मु. पुणेंकर, दु. से. (श्रीसाई संस्थान शिर्डी ) यांचेही एक कीर्तन झालें.

## नवल विशेष

श्री. टी. एन. बाबुराव, मद्रास यांची ता. १८।८।४२ रोजीं रात्रौ एकतास गायन व हार्मोनियम वादनाची हजेरी झाली.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

---

# अनुभव

## ॥ श्री वेंकटेश प्रसन्न ॥

[ लेखिका- गोविंद तनया ]

आज गुरुपौर्णिमा—जीवन पथावर नरदेहाचें जन्मापासून जे जे श्रेष्ठ आत्मे आपणांस सन्मार्गदर्शी झाले असतील त्यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करण्याचा आजचा दिवस आहे. परात्पर गुरुपासून तों अगदीं मूळाक्षरें शिकविणाऱ्या तात्या पंतोजी पर्यंत गुरुपरंपरा समजून आज आदरपूर्वक सर्वांचे स्मरण करून आपण कृतार्थ होणें हें सुज्ञ लोकांचें कर्तव्य आहे.

जन्मापासून मातापितरें गुरु असतात परंतु त्यानंतर अवधूताच्या एकवीस गुरु प्रमाणें मनुष्याला अनेक गुरु असतात. व्यवहारिक विद्यादान करणारे गुरु व त्यानंतर अध्यात्म मार्गावर दर्शन होणारे गुरु सर्वश्रेष्ठ वाटणें स्वाभाविक व योग्यच आहे.

माझे स्वतःचे मनावर धार्मिक संस्कार घडविणेंस कारण होणाऱ्या निरनिराळ्या व्यक्तींना मी माझे श्रेष्ठ गुरु समजून आज त्यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करण्याचा प्रयत्न करीत असतें. कळायला लागलें कीं, माता प्रथम " बाप्पाला नमस्कार कर " असें शिकवून मुलाला हात जोडायला लावते व त्याप्रमाणेंच मलाही शिकवलें गेलें. त्यानंतर कळूं लागतांच ५।६ व्या वर्षीच श्री सद्गुरुस साईबाबा शिर्डी यांचें दर्शन झालें. व त्यांच्यावर जी श्रद्धा बसली ती आजतागायत कायम राहिली. बाळवयांत काहीं समजत नव्हतें हें जरी खरें तरी त्यांचे वेळोवेळीं दिसलेले चमत्कार व त्यांचा त्यांच्या गूढ भावात्मक गोष्टी ह्यामुळें मनावर फार परिणाम झाला. पूर्वी अनेक अनुभव साईलीलेंत दिले आहेतच परंतु अगदीं ताजा अनुभव व चमत्कारपूर्ण अनुभव आज गुरुपौर्णिमेनिमित्त लिहून काढून गुरुबद्दलचे प्रेम व्यक्त करून उतराई होण्याचा प्रयत्न करावा असें मनांत येऊन हें लिहीत आहें.

माझा एक फार वर्षांचा जुना व इमानी नोकर आहे. त्याला वयाचे ४० वर्षांपर्यंत संतान नव्हतें. [illegible] ३६।३७ वर्षें झालीं होतीं. हा माझा नोकर एकदां आमचे मातुःश्रीचे बरोबर नगरास गेला होता व त्यांचेकडून माझेसाठी त्यानें श्रीसाई बाबांचा एक फोटो आणला होता त्याला सुमारें १० वर्षें झालीं परंतु त्यावेळीं मी असें सांगितलें होतें कीं त्याला मुलगा वगैरे होवो म्हणजे बाबांचे शिरडीत किंवा समाधीपुढें तो पाळणा बांधील! आणि गेल्या ४।५ वर्षांत मूल होण्याबद्दल निराश होऊन त्यानें २।३ वेळां पुनर्लग्नाची खटपट केली परंतु दरवेळीं बिचाऱ्या त्याच्या गरीब बायकोची कींव येऊन मी मोडता घातला. असे गेल्या वर्षी बाबांना कींव येऊन किंवा बिचाऱ्या यशोदेच्या हजारों नवसास पावून देव तिच्या हांकेला धांवला व ती ( आमच्या नोकराची बायको ) गरोदर राहिली. तिला नऊ महिने झाले व आतां सर्व नीट होणार ह्या आशेवर सर्व होतीं तोंच ता. १३ एप्रिल १९४२ रोजीं संध्याकाळीं यशोदेच्या पोटांत दुखूं लागलें म्हणून तिचा नवरा घरीं गेला. सरकारी नर्स वगैरे ने तसें सांगितलें होतेंच. रात्रीं ८ ला एकदां चौकशी केली त्यावेळीं अद्याप कांहीं झालें नाहीं असें कळलें. त्याच दिवशीं मीही जरा बेचैन होतें व रात्रीं १० ला अपेक्षित टपाल मिळाल्यावर मन स्वस्थ होऊन डायरी वगैरे लिहून मी अंथरुणावर पडलें तोंच आमचा नोकर आला तो फार घाबरलेला दिसला व म्हणाला बायको बाळंत झाली नाहीं व डॉक्टर म्हणतात मिर-जेस न्यायला हवें! मी तशीच उठलें व जणूं काय बाबांनीं स्फूर्ति दिल्याप्रमाणें सरळ उदीच्या पुड्या केल्या व नोकराचे हातावर टाकून " जा तूं मिरजेस घेऊन सर्व ठीक होईल, घाबरूं नकोस " असें सांगून मी मोकळी झालें. व उदी पोटांत देण्यास सांगितलें. तो परत गेल्यावर मग मला वाटलें कीं बाबांच्या जिवावर मी सांगून तर टाकलें पण आतां माझे कसलें—त्यांचे शब्द त्यांनींच खरे केले तर माझी अब्रू राहील. शेवटीं मी त्यांची साई सच्चरित्रांतली अडलेल्या बाळंतीणीबद्दलची आठवण एकदां वाचली व प्रार्थना केली कीं तसेंच त्यावेळींही करा. व रात्रभर बाबांच्या आरतीच्या आवृत्ति करीत बिछान्यावर पडलें. रात्रीं १२ लाच माझा दुसरा नोकर भाऊंची मोटार उठवून व डॉक्टरना उठवून बरोबर देऊन बाळंतीणीची मिरजेस रवानगी करून आला होता. रात्रीं २ पर्यंत मी जागून वेळ काढला, व अंथरुणावर

जागी असतांनाच मला एक दृश्य डोळ्यापुढें दिसलें. बाबांच्या आरतीच्या ठोकर्डी आवृत्त्या झाल्या असतील. मनांत सारखी विवंचना कीं बिचारी बाई सुखरूपपणानें कशी सुटेल! व तोंडानें स्मरण सुरू असे. २ वाजले व एकदम डोळ्यापुढें आकाशांत विजेचा जसा कडकडाट होऊन लख्ख प्रकाश पडावा तसा लख्ख प्रकाश कमानदार दिसला. व त्या लखलखींत प्रकाशाच्या कमानींतून एक सुंदर बाळसेदार मुलगा बाहेर येतांना दिसला व हें दृश्य पाहून मी मनाशीं ठरविलें कीं बाबांनीं हें काम आपल्यावर घेतलें व उत्तम रितीनें पार पाडणार व मनाला एक प्रकारचें समाधान वाटून मन निश्चित झालें तरी पहाटेपर्यंत झोंप लागली नाहीं. रात्रीं २ वाजून गेल्यावर एकदां उठून नोकर व्यवस्थेला गेला होता त्याला सर्व हकीगत विचारली. तेव्हां तो म्हणाला, डॉक्टरांचे मतें त्यांत काहीं नाहीं. परंतु फार वर्षांनीं मूल आहे त्यामुळें शस्त्राच्या मदतीनें करावें लागणार व ते मिरजे सारख्या सुसज्ज ठिकाणीं झालेलें बरें म्हणून मिरजेस न्यावें लागेल हें ऐकूनही बरें वाटलें. सकाळीं पुनः एकदां चौकशी केली, परंतु डॉक्टर परत आले नव्हते शेवटीं ८ वाजतां त्यांनीं येऊन "बाई सुखरूपपणानें प्रसूत होऊन सशक्त निर्व्यंग असा मुलगा झाला असून दोघेही सुखरूप आहेत असें आनंदाचें वर्तमान त्यांनीं आणलें व मी साईबाबांचे सहस्त्र वेळां आभार मानून माझा दिलेला शब्द त्यांनीं खरा केला ह्या त्यांच्या भक्तप्रेमाला धन्यवाद दिले. ज्यावेळीं ही आमची बाई प्रसूतीसाठीं मिरजेस गेली त्या मुदतींत बऱ्याच बायका त्या दवाखान्यांत काहीं ना कांहीं प्रसूतीच्या अडचणींसाठीं आल्या होत्या. व त्यापैकीं बऱ्याच जणींचीं दोन जीवांपैकीं एकाची हानी झाली व ती एकच बाई त्या पंधरा दिवसांत मुलासह सुखरूपपणानें घरीं आली. माझी तरी खात्री आहे केवळ साईबाबांचे कृपेनेंच ती गोष्ट घडली अशीच त्यांची कृपा सदैव राहो, हेंच मागणें

# श्रीसाईबाबा शिरडी संस्थान

## विक्रीकरितां पुस्तकें.

( कै. गो. र. दाभोळकर कृत )

(१) सच्चरित — किं. रु. ३-८-०
(२) दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवन मंजरी — ,, ०-२-०
,, ,, ( अध्याय ४ ) — ,, ०-४-०
(४) सगुणोपासना — ,, ०-२-०
(५) संस्थानचे नियम पुस्तक ( मराठी ) — ,, ०-६-०
(6) A glimpse of Indian spirituality by Rao Bahadur M. W. Pradhan B. A., LL. B., ADVOCATE & J. P. — ,, 1-0-0
(7) Rules:-Shirdi Santhan of Shri Sai Baba (English) — ,, 0-3-0
(8) A word to South Indian devotees (English) — ,, 0-1 0

वरील पुस्तकांकरितां याखालील पत्यावर लिहून खुलासा घेणें.

(१) कारकून, **शिरडी संस्थान,** मु. शिरडी, पो. रहाते. जि. अहमदनगर
(२) **एडिटर साईलीला गोखले रोड ( नॉर्थ ) दादर-मुंबई १४**
(३) सा. इंदिराबाई सुर्वेचे द्वारकामाई बाबांचे रंगीत चित्र रा. रा. बाबूराव ए. इराणी बिल्डिंग रू नं. ३० चिंचपोकळी रोड, व्हिक्टोरिया गार्डन, मुंबई यांजकडे मिळेल.

(१) रा. रा. वामनराव प्राणगोविंद पटेल हेडमास्तर सोसायटी हायस्कूल उमरेठ जि. केरा; यांजकडे मिळणारीं पुस्तकें.—
( गुजराथी ) मनाचे श्लोक, हरिपाठ व गुरुस्मृती.
(२) डॉ. व्ही. रघुनाथ L. M. & S. वांद्रा यांचे श्री साईनाथ भजनमाला ( श्रीमती सावित्रीबाई तेंडुलकरकृत )

All correspondence regarding Shri Sai Leela should be addressed to Editor, Sai Leela, Gokhale Road (North) Dadar, Bombay.





SANDU'S

HEARTINA

(Regd.)

Specially Indicated in pain in the chest, breathlessness, Palpitation, Tachycardia and other heart Troubles

*Bombay Branches:-* Thakurdwar, Kalbadevi, Parel & Dadar.

**KRIMI ★ USEFUL IN WORMS OF CHILDREN**


**सूचना:**—कोणास जाहिराती देणें असल्यास खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा. **रामचंद्र वासुदेव घैसास** लो. टिळक जुबिली ट्रस्ट बिल्डिंग नं. २ गोखले रोड नॉर्थ, दादर, मुंबई नं. १४.

---


रा. रा. **रामचंद्र वासुदेव घैसास** एडिटर श्री साईलीला यांनी लोकमान्य टिळक जुबिली ट्रस्ट बिल्डिंग नं. २ गोखले रोड, दादर, मुंबई नं. १४ येथें प्रसिद्ध केलें. रा. रा. डी. पी. आगाशे यांनी '**स्वस्तिक प्रिंटर्स**' लेडी जमशेदजी रोड, दादर मुंबई. नं. १४ येथें छापिलें.